# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 26/11/2022 (शनिवार) दुपार

---

### बालविवाह प्रतिबंधक अधिनियमाखाली आरोपीस मा. न्यायालयाकडुन सश्रम कारावासासह दंडाची शिक्षा

बारामती तालुका पोलीस स्टेशन गु. र. नं. ३१/२०१४, भांदवि. कलम ५०६, बालविवाह प्रतिबंधक अधिनियम कलम ११(१) मधील आरोपी नामे– लता वसंतराव राठोड, रा. चिंचवड पुणे हिस मे. आपटे सो., बारामती कोर्ट, पुणे यांनी आरोपीस बालविवाह प्रतिबंध कायदा कलम ११(१) मध्ये दोषी धरून तिला ५०,०००/– रू. दंड, दंड न भरल्यास ०१ महिना साध्या कारावासाची शिक्षा, भांदवि. कलम ५०६ मध्ये दोषी धरून ०१ महिना साध्या कारावासाची शिक्षा व २,०००/–रू. दंड, दंड न भरल्यास ०८ दिवस साध्या कारावासाची शिक्षा सुनावली आहे.

सदर गुन्हयाचा तपास पोलीस निरीक्षक आर. जे. सोनवने, बारामती तालुका पोलीस स्टेशन, सध्या नेमणुक– पारशिवनी पोलीस स्टेशन नागपूर ग्रामीण यांनी केला होता. कोर्ट पैरवी अंमलदार पोलीस शिपाई/१४५३ पी. एस. कवितके यांनी कामकाज पाहीलेले आहे. तर सरकारी अभियोक्ता म्हणुन आदित्य रणसिंग यांनी कामकाज पाहीले आहे.

### अपघातात मृत्यु

**पो.स्टे. पारशिवनी** :– अंतर्गत १६ कि.मी. अंतरावरील मौजा मनसर माहुली रोड, डोलामाइन जवळ दिनांक २५/११/२०२२ चे १५.०० वा. ते १५.१५ वा. दरम्यान यातील मृतक नामे– चेतन गणेश कुमरे, वय १९ वर्ष, रा. भटटीटोला (द्रावदा) ता. रामटेक, पोस्टे देवलापार हा मनसर वरून माहुली मार्ग पारशिवनीला विना नंबरची जुनी हीरो होन्डा सप्लेंडर मोटरसाकलवर येत असता, माहुली कडुन जाणाऱ्या यातील अज्ञात आरोपी वाहन चालकाने आपले वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवुन मृतकाच्या मोटरसायकलला जोरदार धडक मारल्याने मोटरसायकल चालक हा रोडवर खाली पडुन गंभीर जखमी होवुन मरण पावला. अज्ञात आरोपी वाहन चालकाने अपघाताची कोणतीही माहीती पोलीसांना न देता व जखमीला उपचारा करीता न नेता वाहन घेवुन घटनास्थळावरून निघुन गेला.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे–गणेश वारलु कुमरे, वय ४५ वर्ष, रा. भटटीटोला (द्रावदा) ता. रामटेक पोस्टे देवलापार यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पारशिवनी येथे अज्ञात आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ (ए) भादवी, सहकलम १३४, १८४ मोवाका. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक नागुलवार, पोलीस स्टेशन पारशिवनी मो. क्र. ९९२३३७२६४७ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**